
आज दास नवमी

समर्थ रामदास स्वामी यांच्या चरणी कोटी-कोटी प्रणाम


अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | बुधवार, दि.१५ फेब्रुवारी २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : १३८ वा किंमत : ५ रुपये | पाने ८


# मामाची साद भाच्याने धुडकावली

## आ.तांबेंच्या सडेतोड चारोळीने थोरातांची डोकेदुखी वाढली





सुराज्य/सोलापूर

**युद्धात आणि प्रेमात सर्वकाही क्षम्य असे म्हटले जाते पण राजकारणात तसे काही नाही. शत्रू म्हणजे शत्रू. तिथे प्रेम-आपुलकी-नाती वैगेरे बिलकूल झूठ. नाशिक पदवीधर मतदारसंघात काँग्रेसशी बंडखोरी करून निवडणूक जिंकलेले आ. सत्यजित तांबे यांच्या भूमिकेवरून शेजारच्या अहमदनगरमधील राजकारण भलतेच तापले आहे. सत्यजित यांचे मामा असणारे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांची नगरच्या राजकारणावर जबरदस्त पकड आहे. सत्यजित यांच्या बंडखोरीमुळे थोरातांना भलताच मानसिक त्रास सहन करावा लागला.सत्यजित कुठे असणार? यावरून आजही काथ्याकूट सुरू आहे. थोरातांनी आपल्या लाडल्या भाच्याला स्वगृही येण्याची साद घातली पण भाच्याने ती सपशेल फेटाळून लावली. भाच्याने आपल्या ट्विटमधून जी चारोळी टाकली आहे,त्याने नव्या तर्कवितर्कांना उधाण आले आहे.**

आ. तांबे यांच्या आगामी राजकिय भूमिकेबाबत सगळ्यांना उत्सुकता लागून राहिली आहे. थोरात यांनी सोमवारी सत्यजीत यांना अप्रत्यक्षपणे घरवापसीची साद घातली होती. मात्र, त्याच्या दुसऱ्याच दिवशी सत्यजीत यांनी एक ट्विट करुन आपण आता माघार घेण्याच्या मनस्थितीत नसल्याचे सूचित केले आहे. सत्यजीत यांनी एक चारोळी ट्विट केली आहे. 'उडत्या पाखरांना परतीची तमा नसावी, नजरेत सदा नवी दिशा असावी..... घरट्याचे काय? बांधता येईल केव्हाही, क्षितिजा पलीकडे झेप घेण्याची जिद्द असावी', अशा सूचक असणाऱ्या ओळी सत्यजीत यांच्या ट्विटमध्ये आहेत. त्यामुळे सत्यजीत यांनी काँग्रेस पक्षात परतण्याचे सर्व दोर कापून टाकले आहेत का, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. सत्यजीत यांच्या या ट्विटचे राजकीय वर्तुळात निरनिराळे अर्थ काढले जात आहेत.

नाशिक पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीपूर्वी सत्यजीत तांबे हे भाजपमध्ये जाणार असल्याची चर्चा होती. नंतरच्या काळात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षानेही सत्यजीत तांबे यांच्यासाठी फिल्डिंग लावल्याची चर्चा आहे. त्यामुळे सत्यजीत तांबे काँग्रेस पक्षात राहणार की नवी वाट धुंडाळणार, याविषयी अनेक शक्यता व्यक्त केल्या जात होत्या. परंतु, सत्यजीत तांबे यांचे ट्विट पाहता, ते नव्या राजकीय वाटा धुंडाळण्याच्या मानसिकतेत दिसत आहे. तसेच महाराष्ट्राच्या राजकारणात स्वत:ची स्वतंत्र ओळख प्रस्थापित करण्याचा सत्यजीत तांबे यांचा इरादाही या ट्विटमधून प्रतित होत आहे. यावर थोरात आणि महाविकास आघाडीचे नेते आता काय प्रतिक्रिया देणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.


### मामाची चिंता वाढली...

हाताला दुखापत झाल्यामुळे गेले काही दिवस थोरात यांच्यावर उपचार सुरु होते. बऱ्याच दिवसांनी त्यांचा बालेकिल्ला असणाऱ्या संगमनेर तालुक्यात ते सोमवारी परतले. यावेळी केलेल्या भाषणात त्यांनी आपले भाचे सत्यजीत यांना एक मोलाचा सल्ला दिला होता. 'सत्यजीत, तुला काँग्रेसशिवाय आणि काँग्रेसलाही तुझ्या शिवाय करमणार नाही. त्यामुळे तू किती दिवस अपक्ष राहणार, हे आपण ठरवू',असे थोरात यांनी म्हटले होते. मात्र,भाच्याने ही साद धुडकावून लावल्याने मामांची डोकेदुखी पुन्हा वाढली आहे. आपण कुठेही जाणार नाही,असे म्हटले असले तरी सत्यजीत हे भाजपच्याच आश्रयाखाली असतील, अशी काँग्रेसला भीती आहे. आपला भाच्चा स्वगृही आला तर पक्षात आपली ताकत वाढेल, असे थोरातांना मनोमन वाटत आहे. तांबे यांच्या बंडामागे थोरात यांचाच आशीर्वाद असल्याचा संशय पक्षात बळावला आहे.

---

शिंदेंचे सोलापुरातील मुक्काम तसेच ग्रामीण दौरेही वाढले

## ना ना म्हणत लोकसभेची तयारी सुरू असल्याची चर्चा



सुराज्य/सोलापूर

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार यांचा शहरातील मुक्काम तसेच ग्रामीण भागातील दौरे वाढले आहेत. त्यामुळे ना ना म्हणत पुन्हा सुशीलकुमार शिंदे यांनी आतापासून लोकसभेची तयारी सुरू केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. मागील दोन निवडणुकीत भाजपचे उमेदवार सोलापूर लोकसभेवर निवडून आले आहेत. खुद्द सुशीलकुमार शिंदे यांचा लाखापेक्षा जास्त मतांनी दोनवेळा येथून पराभव झाला आहे. शिवाय आता शहर मध्य आणि मोहोळ वगळता उर्वरित चार मतदारसंघात भाजपाचे आमदार निवडून आले आहेत. त्यामुळे यंदाही लोकसभा काँग्रेसला अवघड असल्याचे बोलले जात आहे. असे असतानाच शिंदे यांनी दोन-तीनवेळा आपण निवडणूक लढणार नसल्याचे सांगितले आहे. त्यामुळे काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. मात्र आता अचानक शिंदे यांचा सोलापूर शहरातील मुक्काम वाढला आहे. त्यांनी शहरातील मान्यवरांच्या भेटी गाठीही पुन्हा सुरू केल्या आहेत. तसेच मंगळवारी त्यांनी मंगळवेढा आणि मुस्ती या ग्रामीण भागाचाही दौरा केला. त्यामुळे शिंदे पुन्हा एकदा ना ना म्हणत लोकसभेच्या निवडणुकीत उतरतील, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

### शिंदे यांच्याशिवाय पर्याय नाही

गेल्यावेळीही त्यांनी ना ना म्हणत लोकसभा निवडणूक लढली होती. सध्या काँग्रेसकडे सुशीलकुमार शिंदे यांच्याव्यतिरिक्त प्रणिती शिंदे या एकमेव ताकदवान उमेदवार आहेत. मात्र आ. शिंदे शहर मध्य मतदारसंघ सोडण्याच्या मनस्थितीमध्ये दिसत नाहीत. त्यामुळे सुशीलकुमार शिंदे यांच्याशिवाय काँग्रेसकडे पर्याय नसल्याचे बोलले जात आहे.

### लोकसभेपूर्वी महापालिका महत्वाची

सोलापूर लोकसभेपूर्वी महानगरपालिकेच्या निवडणुका होण्याची शक्यता आहे. ही निवडणूक काँग्रेसच्यादृष्टीने महत्वाची आहे. एकेकाळी महापालिकेत वर्चस्व असलेल्या काँग्रेसचे गतनिवडणुकीत केवळ १४ नगरसेवक निवडून आले होते. त्यामुळे आता जास्तीत जास्त नगरसेवक निवडून आण्यासाठी आ. प्रणिती शिंदे आणि सुशीलकुमार शिंदे या दोघांनीही लक्ष घातले आहे. त्यामुळे शिंदे यांचे सोलापूरचे दौरे वाढल्याचे कार्यकर्ते सांगत आहेत.

---

## सिव्हीलमधील निवासी डॉक्टराची होस्टेलमध्ये आत्महत्या



सुराज्य/सोलापूर

तीन महिन्यापूर्वी पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी सोलापुरात प्रवेश घेतलेल्या एका तरुण डॉक्टराने हॉस्टेलच्या रूममध्ये आत्महत्या केली. ही घटना छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालयातील पी.जी. होस्टेलच्या रूममध्ये मंगळवारी दुपारी उघडकीस आली.या प्रकारामुळे डॉक्टरात खळबळ उडाली आहे.

गौरव राजू वाखरे (वय २५ मूळ रा. विवेकानंद नगर, अंबाजोगाई जि.बीड, सध्या रा.सिविल हॉस्पिटल पीजी हॉस्टेल, रूम नं.३२) असे मयत झालेल्या डॉक्टराचे नाव आहे. त्याने ५ नोव्हेंबर २०२२ रोजी सोलापुरातील वैशंपायन मेडिकल कॉलेजमध्ये (एम.डी.)भूलतज्ञ करीता प्रवेश घेतला होता. होस्टेलच्या रूममध्ये तो अन्य दोन डॉक्टरासोबत रहात होता. सोमवारी रात्री त्याने व्हिडिओ कॉल लावून आई-वडिलांशी बोलला होता. मंगळवारी सकाळी सात वाजेच्या सुमारास रूम मधील दोन्ही डॉक्टर रुग्णालयात गेले होते.एक तास उलटून गेला तरी डॉक्टर गौतम हा आला नाही म्हणून विभाग प्रमुखांनी त्याला मोबाईलवरून संपर्क साधला. त्यावेळी त्याचे मोबाईल स्विच ऑफ आढळून आले. त्यानंतर दुपारी जाऊन पाहणी केली असता. तो बेडवर बेशुद्ध अवस्थेत आढळून आला. त्याला रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत जाहीर केले. मयत गौरव वाखरे यांच्या पश्चात आई-वडील आणि एक भाऊ असा परिवार आहे. त्याचे वडील शिक्षक आहेत. या घटनेची नोंद सदर बझार पोलिसात झाली असून पोलीस निरीक्षक क्षीरसागर आणि त्यांचे सहकारी पुढील तपास करीत आहेत.

### प्रेम प्रकरणातून प्रकार घडल्याचा संशय?

बुधवारी शवविच्छेदन झाल्यानंतर नेमके कारण समजणार आहे. पोलिसांच्या प्राथमिक तपासात रूममध्ये मोबाईल आणि इंजेक्शनच्या आढळले. त्याने विषारी इंजेक्शन घेऊन आत्महत्या केली असावी असा प्राथमिक अंदाज आहे. व्हॅलेंटाईनडेच्या दिवशी घटना घडल्याने प्रेम प्रकरणातून प्रकार घडला असावा असा अंदाजही कांहीनी व्यक्त केला आहे.

---

## साडेसहा लाखांची औषधे आणि मोबाईलचे बॉक्स पळवले

सुराज्य/सोलापूर

कुरियरचे साहित्य वाहतूक करणाऱ्या कंटेनरचे लॉक तोडून चोरट्यांनी ६ लाख ५२ हजार रुपये किंमतीचे औषधे आणि मोबाईलचे बॉक्स पळविले. ही चोरी पुणे महामार्गावरील सावळेश्वर नाक्याजवळ शनिवारी पहाटेच्या सुमारास घडली.

यासंदर्भात कंटेनरचा चालक राजेश कुमार शिवमुर्ती (रा. चांदोली उत्तर प्रदेश) याने मोहोळ पोलिसात फिर्याद दाखल केली. तो टीसीआय कंपनी मधुन कुरिअरचे साहित्य टीएस०८-युएच-३४७७ या कंटेनरमध्ये भरून हैदराबाद ते मुंबईच्या दिशेने निघाला होता. शनिवारी पहाटे ३ वाजेच्या सुमारास सावळेश्वर टोल नाका जवळील हॉटेल किनाऱ्याजवळ त्याने कंटेनर उभा केला होता. त्यावेळी त्याला पाठीमागील लॉक तुटल्याचे दिसून आले. या संदर्भात त्याने कंपनीच्या व्यवस्थापकाकडे माहिती दिली. मॅनेजरने घटनास्थळी येऊन पाहणी केली असता वरील कंपनीचा बॉक्स माल चोरीस गेल्याचे आढळून आले. त्यानंतर मोहोळ पोलिसात चोरीची तक्रार दाखल करण्यात आली.

---

## वाडी कुरोलीत भावकीच्या दोन गटात हाणामारी; ११ जणांविरुद्ध गुन्हा

सुराज्य/सोलापूर

भावकीतील शेत जमीन नांगरण्याच्या कारणावरून शेख यांच्या भावकीतील दोन गटात लोखंडी गज, काठी आणि लाथा बुक्क्याने झालेल्या मारहाणीत ९ जण जखमी झाले. ही घटना वाडीकुरोली (ता.पंढरपूर) येथे सोमवारी सकाळच्या सुमारास घडली. त्यापैकी तिघांना पंढरपूर येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.या प्रकरणात पंढरपूर तालुका पोलिसांनी परस्परविरोधी फिर्याद नोंदवून ११ जणाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

या संदर्भात सरदार गुलाब शेख (वय ६२ रा.वाडी कुरोली) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून त्यांचा भाऊ हिदायतुल्ला गुलाब शेख, बापू गुलाब शेख, अंजुम शेख, अजमत मुजावर, सानिया शेख आणि सुरैय्या शेख अशा ६ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला. या सर्वांनी मिळून शेत नांगरण्याच्या कारणावरून त्यांना काठी, गज आणि लाथाबुक्क्याने मारहाण केली. असे त्यांच्या तक्रारीत नमूद आहे. जखमीपैकी सलीमा शेख, सरदार शेख आणि त्यांचा मुलगा सद्दाम शेख या तिघांना सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

तर हीदायतुल्ला गुलाब शेख (वय ४८ रा.वाडीकुरोली) यांनी दिलेल्या विरुद्ध फिर्यादीवरून पोलिसांनी सरदार गुलाब शेख त्यांची पत्नी सलीमा, मुलगा सद्दाम, अजगर आणि तब्बू शेख अशा ५ जणाविरुद्ध गुन्हा दाखल केला. या सर्वांनी मिळून काठी आणि लाथाबुक्या आणि मारहाण केली.त्यात चौघेजण जखमी झाले. अशी नोंद पोलिसात झाली आहे .

---

## युक्तीवाद ठाकरे गटाने मांडली बाजू; आज शिंदे गटाची 'गुगली'





सुराज्य/नवी दिल्ली

संपूर्ण महाराष्ट्र राज्याचे लक्ष लागून राहिलेल्या महाराष्ट्रातील सत्ता संघर्षाच्या सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीत ठाकरे गटाकडून ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी मंगळवारी युक्तिवाद केला. बुधवारी यावर पुन्हा सुनावणी होणार आहे. शिंदे गटाकडून ज्येष्ठ वकील हरिश साळवे बाजू मांडणार आहेत. त्यामुळे दिवसभरात सत्ता संघर्षावर निर्णय होवू शकला नाही.

नव्या सरकारची स्थापना, १६ आमदारांच्या अपात्रतेची याचिका (ठाकरे गटाकडून), विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांच्याविरोधात अविश्वास प्रस्ताव (शिंदे गटाकडून) यासह विविध मुद्द्यांवर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी सुरु झाली आहे. ही सुनावणी सात न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर करावी, अशी मागणी गेल्या महिन्यात ठाकरे गटाकडून करण्यात आली होती. त्यानुसार मंगळवारी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचुड यांच्या नेतृत्त्वाखालील खंडपीठासमोर या याचिकांवर सुनावणी झाली. त्यात ठाकरे गटाकडून ज्येष्ठ वकील सिब्बल यांनी युक्तिवाद केला.

नाना पटोले यांनी विधानसभा अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. त्यामुळे उपाध्यक्ष नरहरी झिरवळ हे कामकाज पाहत होते. अध्यक्ष नसताना उपाध्यक्ष यांना काम करण्याचे अधिकार असतात. त्यामुळे नबाम रेबिया खटल्याचे तत्त्व महाराष्ट्रासाठी लागू होत नाही, असा युक्तिवाद ज्येष्ठ वकील सिब्बल यांनी केला. तसेच १६ आमदारांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली तेव्हा विधानसभा अध्यक्षांविरोधात अविश्वासाचा ठराव नव्हता. विधानसभा अध्यक्षांनी त्यावेळी पूर्ण प्रक्रिया करुनच शिस्तभंगाची कारवाई केली. तसे त्यांना अधिकार आहेत, असा दावा सिब्बल यांनी केला. मात्र १४ दिवसांची नोटीस बजावणे आवश्यक होते. केवळ ७ दिवसांची मुदत का दिली, असा सवाल न्यायालयाने केला. अधिवेशनच चार ते पाच दिवसांचे होते. असे असताना १४ दिवसांची नोटीस कशी देणार, असे स्पष्टीकरण सिब्बल यांनी दिले. राज्य घटनेने विधानसभा अध्यक्षांना अधिकार दिले आहेत. त्यामुळे त्यांच्यावर विश्वास ठेवायला हवा, असे मत न्यायालयाने व्यक्त केले. सिब्बल यांनी ठाकरे गटाकडून युक्तिवाद पूर्ण केला. त्यामुळे न्यायालयाने ही सुनावणी बुधवारपर्यंत तहकूब केली.

---

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



व्हॅलेंटाइन झालं, आता हे घ्या....


कल्याण

599-39-469

मेन बाजार

----


---

थोरला मंगळवेढा तालीमचा उपक्रम

## शिवजयंतीदिनी अकरा हजार भक्तांसाठी शिवभोजन





सुराज्य/सोलापूर

**शिवजन्मोत्सव निमित्त शिवभक्तासाठी आणि बंदोबस्तासाठी असणाऱ्या पोलीस बांधवांसाठी तसेच शहर जिल्ह्यातून येणाऱ्या शिवप्रेमींसाठी अकरा हजार शिव भोजनाचे आयोजन केले असल्याची माहिती थोरला मंगळवेढा तालीमचे सर्वेसर्वा तथा बाळासाहेबांची शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली**

सोलापूर शहरांमध्ये शिवजयंती मोठ्या उत्साही वातावरणात साजरी केली जाते. मोठ मोठ्या मिरवणुका निघतात मिरवणुका दरम्यान शहरातील सर्व हॉटेल रेस्टॉरंट बंद असतात. मिरवणुका पाण्यासाठी आलेल्या शहर जिल्ह्यातील शिवप्रेमींची गैरसोय होते. हे लक्षात घेऊन मिरवणुकीला फाटा देत छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरणी पोटभर जेवण देऊन शिवप्रेमींना तृप्त करण्याचा उपक्रम थोरला मंगळवेढा तालमीच्या वतीने प्रतिवर्षी आयोजित केला जातो. गेली दोन वर्ष कोरोनामुळे हा उपक्रम राबवला गेला नाही मात्र यापूर्वी घेतलेल्या उपक्रमामध्ये १००० शिवप्रेमींनी या शिव भोजनाचा आस्वाद घेतला होता. यंदाच्या वर्षी मिळणारा प्रतिसाद आणि होणारी गर्दी लक्षात घेऊन ११ हजार शिवभक्तांना आणि शिवप्रेमींना तसेच बंदोबस्तासाठी असणाऱ्या पोलीस बांधवांना भोजन शिव भोजन देण्याचा निर्णय घेतल्याचे शिंदे यांनी यावेळी सांगितले. शिव भोजनासाठी येणाऱ्या शिवभक्तांना टेबल खुर्चीवर बसून पुरी, दोन भाज्या, मसाला भात, तसेच स्वीट असणार आहे. यासाठी दोनशे वाढपीची नियुक्ती केली आहे . महिलांसाठी स्वतंत्र व्यवस्था या शिव भोजनाच्या ठिकाणी महिला वृद्ध आणि लहान मुलांसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था ची सोय करण्यात आले असल्याचे अमोल शिंदे यांनी यावेळी सांगितले. १९ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सहा ते रात्री बारा वाजेपर्यंत हा उपक्रम राबवला जाणार आहे .छत्रपती शिवाजी महाराज चौकातील यात्री कॉटेज येथे बाजीआण्णा मठाजवळ शिवभोजन होणार आहे. तरी सर्व शिवभक्तांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहान अमोल शिंदे यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस सागर पिसे , हर्षल वाघमोडे, किरण सिंह चौव्हान, अमित पवार , वैभव विभुते यांच्यासह मंगळवेढा तालमीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### यांची राहणार उपस्थिती

शिवभजनाच्या उपक्रमाचे उद्घाटन बाळासाहेबांची शिवसेनेचे संपर्कप्रमुख शिवाजी सावंत , आमदार शहाजी बापू पाटील, आ.विजयकुमार देशमुख, आ. सुभाष देशमुख , सचिन कल्याणशेट्टी , प्रणिती शिंदे समाधान आवताडे, माजी आमदार राजन पाटील, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, पोलीस आयुक्त राजेंद्र माने, महापालिका आयुक्त शितल तेली उगले, माजी महापौर महेश कोठे, पोलीस अधीक्षक शिरीष सर देशपांडे या प्रमुख तसेच शहर जिल्ह्यातील नेते मंडळींच्या उपस्थितीत हा उपक्रम राबवला जाणार असल्याचे शिंदे यांनी यावेळी जाहीर केले.